Adfactors Public Relations
Knowledge-driven communications

**PUBLICATION NAME** : **PUDHARI LONAVALA**

**CITY WHERE IT APPEARED** : **PUNE**

**DATE** :**28—8--- 2010**

**PAGE NO** : **6**

---

# लोणावळ्यामध्ये उभा राहणार पहिला शॉपिंग मॉल

लोणावळा : वार्ताहार

सुमारे ८० करोड रुपये गुंतवणूक व १.५ लाख चौरस फुटांचा लोणावळा स्क्वेअर, हा शॉपिंग मॉल लोणावळ्यामध्ये उभा राहात असून, येथे येणाऱ्या पर्यटकांचे हे एक आकर्षण स्थळ ठरावे या दृष्टीने शॉपिंग सेंटर सोबतच येथे विविध मनोरंजनात्मक बाबींचा समावेश करण्यात आला आहे.




■ लोणावळ्यात उभा राहात असलेला लोणावळा स्क्वेअर मॉल.

धनलक्ष्मी बिल्डर्स ॲण्ड डेव्हलपर्स व बियॉण्ड स्क्वेअरफिट ॲडव्हायसरी प्रा.लि. यांनी संयुक्तपणे या मॉलची घोषणा पत्रकार परिषदेमध्ये केली. लोणावळ्यासारख्या तिसऱ्या दर्जाच्या परंतु पर्यटनस्थळ म्हणून प्रसिद्ध पावलेल्या शहरामध्ये लोणावळा स्क्वेअर हा शॉपिंग मॉल बड्या महानगरांमधून येथे पर्यटनासाठी येणाऱ्या पर्यटकांचे योग्य आतिथ्य करेल तसेच स्थानिकांनाही खरेदीसाठी अनेक पर्याय उपलब्ध करून देईल, असा विश्वास या मॉलच्या व्यवस्थापनाने पत्रकार परिषदेदरम्यान व्यक्त केला. लोणावळा स्क्वेअर या शॉपिंग मॉलमध्ये तीन पडद्याचे मल्टीप्लेक्स थिएटर, हाय-टेक राईड्स, बॉलिंग ॲली, रिडम्पशन गेम्स आणि तऱ्हेतऱ्हेच्या १३ प्रकारची स्वयंपाक घरे व चार रेस्टॉरंट यांच्यासह सुपर मार्केट तसेच ४० वेगवेगळी दुकाने यांचा समावेश असणार आहे. पुणे-मुंबईसारख्या शहरांतून दर आठवड्याला लोणावळ्यामध्ये सुमारे ६० हजार पर्यटक येत असतात; परंतु त्यांना येथे खरेदीसाठी खूप कमी प्रमाणात पर्याय उपलब्ध आहेत. ■